कस्टोडियन
श्री. पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बॅक लि. नंदुरबार ता.जि. नंदुरबार (नोंदणी रद्द)
मुख्य कार्यालय, तळोदारोड, नंदुरबार
E-mail : pkb_nbr@rediffmail.com Contact No. 9423942085

---

## ई-निविदाद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता जाहीर सूचना

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 105(1) (क) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी कस्टोडियन, श्री. पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बॅक लि. नंदुरबार ता.जि. नंदुरबार (नोंदणी रद्द) या बँकेच्या स्वमालकीच्या खालील प्रमाणे वर्णन केलेली मालमत्ता कस्टोडियन, श्री. पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बॅक लि. नंदुरबार ता.जि.नंदुरबार (नोंदणी रद्द) यांच्या ताब्यात आहे. सदर मालमत्ता मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.ना.बँका/स.आ.-1/श्रीपीकेआण्णापाटीलजनताबँक/जागाविक्री/2025/2644 दि.08/10/2025 अन्वये अपसेट प्राईस व विक्रीस मान्यता दिलेली होती.

सदर स्थावर मालमत्ता ई-निविदाद्वारे जाहिर लिलावाने विक्रीसाठी दोन वेळा मुदतवाढ देवूनही निविदादारांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने ई-निविदा प्रक्रिया स्थगित करुन सदर मालमत्तांचे डिस्ट्रेस प्राईसला मान्यता मिळण्यासाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांना दिनांक 27/02/2026 रोजीच्या प्रस्ताव सादर केला असता त्यांस त्यांचे कडील दि.09/04/2026 रोजीचा आदेश जा.क्र.ना.बँका/स.आ.-1/श्रीपीकेआण्णापाज बँक/जागाविक्री/2026/640 अन्वये डिस्ट्रेस प्राईसला मान्यता दिलेली आहे. बँकेच्या स्वमालकीची व ताब्यात असलेली खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विक्रीकरिता जाहीर विक्री सूचना प्रसिध्द करीत आहे.

### विक्री करावयाच्या मालमत्तेचे वर्णन व तपशिल

| अ. क्र. | स्थावर मालमत्तेचा तपशिल | डिस्ट्रेस् व्हॅल्यु रुपयामध्ये | इसारा रक्कम ठेव रक्कम (15%) | लिलावमध्ये वाढविण्याची रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे नंदुरबार ता.जि.नंदुरबार येथील मुख्य शाखा इमारत गुरुनानक मार्केट नंदुरबार नगरपालिका **हद्दीतील सिसनं.** 637/अे क्षेत्रफळ 127.90 चौ.मी. दोन मजली इमारत | 1,98,00,000/- | 29,70,000/- | 1,00,000/- |
| 4 | मौजे नंदुरबार ता.जि.नंदुरबार येथील मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारत नंदुरबार नगरपालिका हद्दीतील आदेशवर नगर भुमापन क्र.618/अे पैकी **प्लॉट नं.**58 बिनशेती क्षेत्रफळ 622.60 चौ.मी. व एक मजंली बांधकाम जुनी इमारत | 3,27,35,000/- | 49,10,250/- | 1,00,000/- |
| 5 | मौजे शिरपुर ता.शिरपुर जि. धुळे येथील शिरपुर शाखा इमारत शिरपुर नगर पालिका हद्दीतील सिसनं. 1605/अ-1 महाराजा कॉम्प्लेक्स पहिला मजला 'सी' विंग गाळा क्र.226 क्षेत्रफळ 251.44 चौ.मी. | 1,42,57,000/- | 21,38,550/- | 1,00,000/- |

**अटी आणि शर्ती :-**

1) **एकच निविदा :-**

निविदाधारकाने वर नमुद स्थावर मालमत्तेचा ई-निविदाव्दारे फक्त https://mahatenders.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून दिनांक 13/04/2026 रोजी पासून ते 27/04/2026 दुपारी 4.00 वाजे पर्यंत स्थावर मालमत्तानिहाय ई-निविदा भरणे आवश्यक राहिल.

2) **निविदा फी :-**

2.1) निविदा फी रुपये 500/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) (विना परताव्याचे ) एवढी राहिल. इच्छुक निविदाकारांनी ई-निविदा फॉर्मची फी ऑनलाईन भरणा करावी व स्थावर मिळकतीच्या वाजवी एकूण किंमतीच्या 15% (पंधरा टक्के) इतकी इसा-याची रक्कम कस्टोडियन,**श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बॅंक लि.नंदुरबार,स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा- नंदुरबार (चालू) खाते क्रमांक 11386088189, आयएफएससी कोड : SBIN0000435** मध्ये आरटीजीएस/ एनईएफटी फंड ट्रान्सफर (ऑफलाईन) मार्फत मालमत्तेनिहाय स्वतंत्रपणे भरणा करावी लागेल.

2.2) खुली ई-निविदा पध्दतीव्दारे स्थावर मिळकती विल्हेवाटसाठी प्रदानित केलेल्या वित्तीय अधिकारात स्थावर मिळकत विल्हेवाट लावण्यास कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार ता.जि.नंदुरबार (नोंदणी रद्द) हे सक्षम अधिकारी आहेत. सर्वात जास्त दराची निविदा वित्तीय अधिकारानुसार, मा. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे मान्यतेस्तव सादर केली जाईल. मान्यतेनंतरच निविदाकारास स्थावर मालमत्ता विक्री केली जाईल.

3) **इसारा रक्कम :**

3.1) ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांना निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणे बंधनकारक राहिल. निविदा न भरल्यास किंवा अपूर्ण ठेवल्यास त्यांची संपूर्ण रक्कम जप्त करण्यांत येईल.

3.2) विनिर्दिष्टीत केलेल्या इसारा रक्कमेपेक्षा कमी रक्कम भरणा-या निविदाधारकाची निविदा अपात्र ठरवुन भरलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यांत येईल.

3.3) इसारा रक्कमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

4) **डिस्ट्रेस व्हॅल्यु :**

विक्री करावयाच्या स्थावर मालमत्तेची मालमत्तानिहाय **डिस्ट्रेस व्हॅल्यु** (Distress Value) वर नमुद केलेल्या तक्त्याप्रमाणे आहे.

5) **निविदा मंजुरीचे अधिकार :**

खुली ई-निविदा पध्दतीव्दारे स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि.नंदुरबार ता.जि.नंदुरबार (नोंदणी रद्द) हे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सक्षम अधिकारी असतील. सदर मालमत्तांचा विक्रीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, विक्रीची अंतिम मंजुरीसाठी मालमत्तानिहाय प्रस्ताव तयार करुन मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर केला जाईल. सदर मंजुरी नंतरच निविदाकारास स्थावर मालमत्ताची अंतिम विक्री केली जाईल.

6) **अनामत रक्कम :**

6.1) लिलावातील सर्वाधिक बोली बोलणा-या निविदाकाराने बोलीच्या 15%(इसारा रक्कम व्यतिरिक्त ) रकमेचा त्याच तारखेचा रेखांकित धनाकर्ष कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार यांचे नांवे देणे तसेच उर्वरित रक्कम निबंधकाचे मंजुरीस अधिन राहून 30 दिवसांचे आंत कस्टोडियन,श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार यांचे नांवे धनाकर्ष/ई-पेमेंटव्दारे करणे आवश्यक राहील. सदर रकक्म जमा न झाल्यास निविदाधारकाडून प्राप्त 15% इसारा रक्कम जप्त करण्यांत येईल.

6.2) निविदाधारकाने अदा केलेल्या कोणत्याही रक्कमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

7) **ई-निविदा पध्दती :**

7.1) निविदाकाराने निविदामध्ये बँकेची कोणती स्थावर मालमत्तेसाठी निविदा सादर करावयाची आहे याचा स्पष्ट उल्लेख नमुद करावा.

7.2) खुली ई-निविदा सादर करतांना ती लिफाफा पध्दतीने ई-निविदा सादर करावी. तसेच दस्तऐवजांच्या प्रमाणीत प्रती या समक्ष बँकेचे मुख्य कार्यालय,तळोदारोड नंदुरबार येथे सादर करावेत.

7.3) निविदाकाराने निविदेमध्ये कोणत्याही प्रकारची अट नमुद करु नये.

7.4) प्राप्त लेखी आक्षेपांची प्रचलित शासन नियमातील तरतुदीनुसार छाननी करुन योग्य तो निर्णय घेण्यांत येईल.

7.5) निविदा अथवा निविदेमध्ये कोणतीही अट अथवा पर्याय निविदाकारास देता येणार नाही. अशा अटीयुक्त निविदा अपात्र ठरविण्यांत येतील.

7.6) भारतीय दंड विधान 1860 अन्वये ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झाली असल्यास अशा व्यक्तींना तसेच भागीदारी संस्था/सहकारी संस्थाना शिक्षेच्या कालावधीत सदर स्थावर मालमत्ता विक्री निविदेत भाग घेता येणार नाही.

7.7) निविदाधारकाने स्थावर मालमत्तेची पाहणी, तपासणी तसेच निविदेच्या अटी यांची खात्री करुन निविदेत दर नमुद करावेत.मागावुन दरातील बदलाबाबतची विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेण्यांत येणार नाही.

**8) सर्व साधारण अटी :**

8.1) बँकेची स्थावरमालमत्ता जे आहे जेथे आहे (फर्निचर, संगणक व इतर साहित्य वगळून) जसे आहे आणि जे काही आहे या तत्वावर विक्री केली जाईल (As were as it is).

8.2). डिस्ट्रेस व्हॅल्यु खाली ई-निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

8.3) प्रयोज्य मुद्रांक शुल्क / अतिरिक्त मुद्रांक शुल्क / हस्तांतर आणि नोंदणी प्रभार व इतर शुल्क,टॅक्सेस हे मालमत्ता खरेदीदारांनाच भरावे लागतील.

8.4) वरील मिळकतीशी संबंधित विद्यमान व भविष्यातील सर्व वैधानिक / अवैधानिक थकबाकी, कर, दर,निर्धारण,प्रभार शुल्क, दावे इत्यादी याची संबंधित सोसायटी / प्राधिकरणाकडे निश्चिती व खात्री करुन घेण्याची जबाबदारी फक्त निविदाधारकाची राहील.

8.5) ई-निविदा प्राप्ती नंतर निविदाधारकांच्या उपस्थतीत निविदा दिनांक 28/04/2026 रोजी दुपारी 4.00 वाजता आलेल्या निविदा उघण्यांत येतील. यापैकी डिस्ट्रेस व्हॅल्युपेक्षा अधिक असणा-या सर्व निविदाधारकांना स्पर्धात्मक दराने बोली बोलण्याची संधी उपलब्ध करुन देण्यांत येईल व सदर कार्यवाही मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नंदुरबार यांच्या उपस्थितीत मालमत्ता विक्रीची प्रक्रिया पूर्ण करण्यांत येईल.

8.6) ज्या निविदाकाराची निविदा मंजूर केली जाईल त्या निविदाकारास मंजूरी मिळाल्यानंतर 30 (दिवस) दिवसांचे आंत लिलावाच्या अंतिम बोलीची संपूर्ण रक्कम कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि.नंदुरबार या बँकेच्या बँक खात्यात भरणा करावी लागेल. सदर लिलावास मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मंजुरी मिळाल्यानंतर स्थावर मालमत्तेची निविदाकारास स्वखर्चाने खरेदीखताची व स्थावर मालमत्ता ताब्यात देण्याबाबतची परवानगी देण्यांत येईल.

8.7) निविदाधारकाने कोणत्याही शर्तीचे अगर अटींचे उल्लंघन केल्यास, प्रचलित नियमानुसार त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.

8.8) वर नमुद स्थावर मालमत्तेचा निविदा सादर करण्यापुर्वी सदर मिळकतीच्या संदर्भातील त्याचाव्दारे देय थकबाकी आणि हक्क, नामाधिकार, हितसंबंध प्रत्यक्ष पाहून, तपासून तसेच निविदेच्या अटी यांची खात्री करुनच ई-निविदा भरण्यांत याव्यात. निविदा उघडल्यानंतर अथवा निविदा मंजूर झाल्यानंतर स्थावर मालमत्ता संबंधी कोणीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

8.9) वर नमुद स्थावर मालमत्ता निविदाधारक यांना पहावयाची असल्यास सदरची मालमत्ता सुटीचे दिवस वगळता दिनांक 13/042026 ते 24/04/2026 या कालावधीत आगाऊ वेळ घेऊन (by appointment) मालमत्तेचे ठिकाणी बघता येईल. यासाठी बँकेचे अधिकारी श्री. यशवंत सेना मोहिते यांचा भ्रमणध्वनी क्रमांक 94239 18394 वर संपर्क साधता येईल.

8.10) निविदा धारकावर गुन्हेगारी स्वरुपाचा, गुन्हा दाखल झालेला असल्यास सदर बाब निदर्शनास आल्यास संबंधित निविदा रद्द करुन कस्टोडियन,श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि.नंदुरबार (नोंदणी रद्द) ता.जि.नंदुरबार यांना झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम संबंधीतांकडून वसुल केली जाईल, याची नोंद घ्यावी.

8.11) प्रचलित शासन नियमानुसार, निविदाधारकाडून स्थावर मालमत्तेच्या एकूण खरेदी रकमेवर, प्रचलित दराने कर वसुल केला जाईल व तो एक रक्कम भरावा लागेल.

8.12) निविदा कोणतेही कारण न देता मंजूर करण्याचा अथवा नामंजुर करण्याचा अधिकार कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार (नोंदणी रद्द) ता.जि. नंदुरबार यांनी राखून ठेवला आहे.

8.13) निविदेतील कोणत्याही टप्यावर निविदा अटीमध्ये बदल करणे अथवा शिथिल करणे अगर नवीन अट समाविष्ट करण्याचा कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार (नोंदणी रद्द) ता.जि.नंदुरबार यांना संपूर्ण अधिकार राहिल.

**9) निविदाधारकांसाठी सर्वसाधारण सूचना :**

9.1) ई-टेंडर प्रक्रिमेमध्ये आवश्यक ते सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.

9.2) निविदाकाराने निविदा भरतांना निविदा भरण्याच्या अंतिम कालावधीपर्यंत वाट न पाहता मुदतीत निविदा अपलोड करण्याची दक्षता घ्यावी.अंतिम क्षणी निविदा भरता न आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकाराची राहिल व याबाबत कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.

9.3) स्थावर मालमत्तेच्या खरेदीच्या अनुषंगाने सर्व प्रकारचे कर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

Shri. P.K. Anna Patil Janta Sahakari Bank Ltd. Nandurbar (In Liquidation)

( मनोज चौधरी )
कस्टोडियन

**स्थळ : नंदुरबार**
दि. 20 /04/2026

**श्री. पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार (नोंदणी रद्द)**

कस्टोडियन, श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार (नोंदणी रद्द)
या बँकेच्या स्थावर मिळकतीची विक्री संबंधी खुली ई-निविदा (सन 2026)

परिशिष्ट - ' ब '

## -: ई —निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक :-

| अ.नं. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ई- निविदा सूचना जाहिरात (प्रसिध्द )करणे | 20/04/2026<br>सकाळी 11.00 वाजता |
| 2 | निविदा उपलब्ध कालावधी (निविदा फॉर्मची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन जमा करणे.) | 20/04/2026 ते<br>04/05/2026<br>सायंकाळी 04.00 वाजे पर्यंत |
| 3 | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | 04/05/2026<br>सायंकाळी 04.00 वाजे पर्यंत |
| 4 | निविदा लिफाफा उघण्याचा दिनांक | 05/05/2026<br>सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत |
| 5 | कस्टोडियन स्तरावर निविदा मंजूरीबाबत निर्णय | निविदा उघल्याच्या दिनांकापासून<br>2(दोन)दिवसांच्या आंत<br>दिनांक 07/05/2026 |
| 6 | मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांना निविदा मंजुरीस अहवाल सादर करणे | 16/05/2026 पर्यंत |
| 7 | **ई-निविदा सादर करण्यासाठी वेबसाईट :- https://mahatenders.gov.in** | |

स्थळ : नंदुरबार
दि. 20/04/2026

( मनोज चौधरी)
कस्टोडियन,
श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार(नोंदणी रद्द)
ता.जि.नंदुरबार

## कस्टोडियन,श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार (नोंदणी रद्द)

## या बँकेच्या स्थावर मिळकतीची विक्री संबंधी खुली ई-निविदा (सन 2026)

### परिशिष्ट - ' अ'

निविदेसोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची सूची

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| 1 | स्वत:चे नांव, फर्मचे नांव, पत्ता, ई-मेल, दुरध्वनी/मोबाईल क्रमांक नमूद करावा |
| 2 | आधारकार्ड (UID), पॅन कार्ड (PAN Card) |
| 3 | सहकारी संस्थांच्या बाबतीत नोंदणी दाखला, भागीदारी फर्म बाबतीत नियमावली, भागीदारीपत्रक |
| 4 | निविदा फी व इसारा रक्कम भरणा केल्याची पावती. |
| 5 | निविदाकाराचा PAN क्रमांक अथवा TAN क्रमांक कागदपत्रांची साक्षांकित प्रत. |
| 6 | GST करदाता असल्यास तसे प्रमाणपत्र, GST क्रमांक नमुद करावा. |
| 7 | निविदेतील सर्व अटी व शर्तींना बांधील आहे असे अशा आशयाचे शपथपत्र (स्टॅम्प पेपरवर) |
| 8 | निविदा मंजूर झाल्यास निविदा सूचनेत नमुद केलेल्या प्रमाणे विहित कालावधीत स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्यांत येईल असे शपथपत्र (स्टॅम्प पेपरवर) |

स्थळ : नंदुरबार

दि. 20/ 04/2026

( मनोज चौधरी )

कस्टोडियन,

श्री.पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि. नंदुरबार (नोंदणी रद्द)

ता.जि.नंदुरबार

Signature Not Verified

Digitally signed by Yashwant Sena Mohite
Date: 2026.04.20 09:45:00 IST
Location: Maharashtra-MH